राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत यापूर्वी तत्वत: मंजूर एकूण चौदा (१४) प्रकल्पांची प्रशासकीय मान्यता रद्द करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः रासयो-२०२६/प्र.क्र.२४/तां.क.३**
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २७ एप्रिल, २०२६

**वाचा :-**

१) पर्यावरण विभाग शासन निर्णय क्र.इएनव्ही २००८/प्र.क्र.६९/तां.क.३, दि.२७.०८.२००८

२) सुकाणू समितीच्या दि.१६/०२/२०२६ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना-**

राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धन करण्यासाठी राज्य शासनामार्फत राज्य सरोवर संवर्धन योजना सन २००६-०७ या वर्षापासून सुरू करण्यात आलेली आहे. राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत यापूर्वी तत्वत: मान्यता प्राप्त झालेले तसेच निधी वितरीत केलेल्या तलाव संवर्धन प्रकल्पांपैकी विभागाकडे अंतिम मान्यतेसह प्रशासकीय मान्यतेसाठी सादर ११ तलाव संवर्धन प्रस्ताव दि.१६/०२/२०२६ रोजी आयोजित सुकाणू समितीसमोर सादर केले असता सुकाणू समितीमार्फत त्यापैकी पाच (०५) तलाव संवर्धन प्रस्ताव राज्य सरोवर संवर्धन योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विहीत नमुन्यात नसल्याने सदर प्रकल्पांकरिता यापूर्वी प्रदान करण्यात आलेली तत्वत: मान्यता रद्द करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच यापूर्वी तत्वत: मान्यता प्राप्त झालेले तसेच निधी वितरीत केलेल्या एकूण नऊ (०९) तलाव संवर्धन प्रस्तावांचे सुधारित प्रकल्प अहवाल सुमारे दोन वर्षांपेक्षा जास्तचा कालावधी उलटूनही संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा/ स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत विभागास अद्यापही प्राप्त न झाल्याने सदर एकूण नऊ तलाव संवर्धन प्रकल्पांची तत्वत: मान्यता रद्द करण्याची सुकाणू समितीमार्फत शिफारस करण्यात आली आहे. त्यानुषंगाने सुकाणू समितीच्या शिफारशींनुसार उपरोक्त चौदा (१४) तलाव संवर्धन प्रकल्पांना यापूर्वी देण्यात आलेली तत्वत: मान्यता रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत यापूर्वी तत्वत: मान्यता प्राप्त झालेले तसेच निधी वितरीत केलेल्या तलाव संवर्धन प्रकल्पांपैकी विभागाकडे अंतिम मान्यतेसह प्रशासकीय मान्यतेसाठी सादर ११ तलाव संवर्धन प्रस्ताव दि.१६/०२/२०२६ रोजी आयोजित सुकाणू समितीसमोर सादर केले असता सुकाणू समितीमार्फत त्यापैकी पाच (०५) तलाव संवर्धन प्रस्ताव राज्य सरोवर संवर्धन योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विहीत नमुन्यात नसल्याने सदर प्रकल्पांकरिता यापूर्वी प्रदान करण्यात आलेली तत्वत: मान्यता रद्द करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच यापूर्वी तत्वत: मान्यता प्राप्त झालेले तसेच निधी वितरीत केलेल्या एकूण नऊ (०९) तलाव संवर्धन प्रस्तावांचे सुधारित प्रकल्प अहवाल सुमारे दोन वर्षांपेक्षा जास्तचा कालावधी उलटूनही संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा/ स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत विभागास अद्यापही प्राप्त न झाल्याने सदर एकूण नऊ तलाव संवर्धन प्रकल्पांची तत्वत: मान्यता रद्द

करण्याची सुकाणू समितीमार्फत शिफारस करण्यात आली आहे. सबब, राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत दि.१६/०२/२०२६ रोजीच्या सुकाणू समितीच्या शिफारशींनुसार सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विहीत नमुन्यात नसलेल्या प्रपत्र - अ मध्ये नमूद एकूण पाच (०५) तलाव संवर्धन प्रकल्पांची तसेच सुमारे दोन वर्षांपेक्षा जास्तचा कालावधी उलटूनही अद्यापही सुधारित प्रकल्प अहवाल विभागास सादर न करण्यात आलेल्या प्रपत्र - ब मध्ये नमूद एकूण नऊ (०९) तलाव संवर्धन प्रकल्पांची तत्वत: मान्यता सदर शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२. उपरोक्त **प्रपत्र - अ** व **प्रपत्र - ब** मध्ये नमूद एकूण चौदा (१४) तलाव संवर्धन प्रकल्पांना यापूर्वी देण्यात आलेली तत्वत्त: मान्यता रद्द करण्यात येत असल्याने वित्तीय अनियमितता टाळण्याकरिता सदर प्रकल्पांकरिता राज्य शासनामार्फत यापूर्वी वितरीत करण्यात आलेला निधी व्याजासह **३४३५ या प्रधान लेखाशीर्षांतर्गत ९११ या गौणलेखाशीर्षाखाली** शासनाकडे तात्काळ जमा करण्याची कार्यवाही संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांनी करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२७१७१५३८६६०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAMESH MURARI MANALE

Digitally signed by RAMESH MURARI MANALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Environment Department, 2.5.4.20=3AFDFF0BF288C02A1A4C514992D6AB6F28B31FCBD83BCCF465EC868151EE5BBD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A544F07211AC905895E246B961BC9981C480A91372BB58AE26124A46F104C47, cn=RAMESH MURARI MANALE
Date: 2026.04.27 17:16:29 +05'30'

**(रमेश मु. मनाळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राज भवन, मुंबई.
२. मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल ) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल), मंत्रालय, मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड जि.रायगड.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक, जि.नाशिक.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव, जि.जळगाव.
१०. मुख्याधिकारी, परळी वैजनाथ नगरपरिषद, जि.बीड.
११. मुख्याधिकारी, औसा नगर परिषद, ता.औसा, जि.लातूर.
१२. मुख्याधिकारी, लांजा नगरपंचायत, ता. लांजा जि. रत्नागिरी.
१३. कार्यकारी अभियंता/प, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ ,म्हाडा.
१४. महालेखापाल (लेखापरिक्षा) १. महाराष्ट्र मुंबई-४०००२०.
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई- ४०००२०.
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.

१७. महालेखापाल (लेखापरिक्षा) २. महाराष्ट्र, नागपूर.

१८.अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१.

१९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

२०. निवासी लेखाधिकारी, मुंबई.

२१. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

२२. मुख्यलेखा परिक्षक, स्थानिक निधीलेखा, कोकण भवन, मुंबई.

२३. वित्त विभाग (कार्यासन क्रमांक व्यय-१६/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई.

२४. नियोजन विभाग, कार्यासन क्र.१४७२, मंत्रालय, मंबई.

२५. रोखशाखा, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई.

२६. निवडनस्ती (कार्या-तां.क.३).

**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग शासन निर्णय क्र. रासयो-२०२६/प्र.क्र.२४/तां.क.३, दि. २७/०४/२०२६ सोबतचे**

**प्रपत्र - अ**

| अक्र. | तलावाचे नाव | संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था/ अंमलबजावणी यंत्रणा | प्रकल्पाची तत्वत: मंजूर रक्कम | वितरीत करण्यात आलेली रक्कम | सुकाणू समिती दि. | तत्वत: मान्यतेचा शासन निर्णय दि. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुक्तेश्वर तलाव नगर परिषद औसा, जि. लातूर | मुख्याधिकारी नगर परिषद औसा | ३,७७,७८,६६० | १,५०,००,००० | २७-०२-२०२३ | ३१-०३-२०२३ |
| २ | समतानगर तलाव नगर परिषद औसा, जि. लातूर | मुख्याधिकारी नगर परिषद औसा | ३,८९,९२,९२० | १,५०,००,००० | २७-०२-२०२३ | ३१-०३-२०२३ |
| ३ | औसा तलाव नगर परिषद औसा, जि. लातूर | मुख्याधिकारी नगर परिषद औसा | ३,८३,४५,७९१ | १,५०,००,००० | २७-०२-२०२३ | ३१-०३-२०२३ |
| ४ | ओझर तलाव लांजा नगरपंचायत, ता. लांजा जि. रत्नागिरी | मुख्याधिकारी लांजा नगरपंचायत | ९९,९७,९१८ | ५०,००,००० | १७-०३-२०२२ | ३१-०३-२०२२ |
| ५ | मौ. वदप तलाव मौजे वदप ता. कर्जत जि. रायगड | मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.रायगड | १,२६,९९,२१७ | ६३,००,००० | ३१-१०-२०२३ | २७-०२-२०२४ |

RAMESH MURARI MANALE

Digitally signed by RAMESH MURARI MANALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Environment Department, 2.5.4.20=3AFDFF0BF288C02A1A4C514992D6AB6F28B31FCBD83BCCF465EC868151EE5BBD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A544F07211AC905895E246B961BC9981C480A91372BB58AE26124A46F104C47, cn=RAMESH MURARI MANALE
Date: 2026.04.27 17:16:45 +05'30'

**(रमेश मु. मनाळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग शासन निर्णय क्र. रासयो-२०२६/प्र.क्र.२४/तां.क.३, दि.२७/०४/२०२६ सोबतचे**

**<u>प्रपत्र - ब</u>**

**(रक्कम लाखांत)**

| अ .क्र. | प्रकल्पाचे नाव | संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था/ अंमलबजावणी यंत्रणा | प्रकल्पाची मंजूर किंमत | आकृतीबंध | राज्य शासनाचा हिस्सा | स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा | यापूर्वी वितरीत शासन हिस्सा | निधी वितरणाचा शासन निर्णय दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एरंगळ तलाव, एरंगळ शहर, माध, मुंबई | कार्यकारी अभियंता/प, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ , म्हाडा. | ३०० | ७०:३० | २१० | ९० | १५० | ३१/०३/२०२२ |
| २ | खंबाळे तलाव, ता. इगतपूरी, जि.नाशिक | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक. | ५० | ९०:१० | ४५ | ५ | २५ | ३१/०३/२०२२ |
| ३ | पारंपोक तलाव, परळी वैजनाथ नगरपरिषद, जि.बीड. | मुख्याधिकारी, परळी वैजनाथ नगरपरिषद, जि.बीड. | ३५० | ८०:२० | २८० | ७० | १७५ | २७/०३/२०२३ |
| ४ | बेलोशी तलाव मौजे. बेलोशी, ता. अलीबाग, जि. रायगड | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड. | १३६ | ९०:१० | १२२.४ | १३.६ | ६८ | १८/०१/२०२४ |
| ५ | कळमडू तलाव मौजे कळमडू, ता. चाळीसगाव, जि. जळगाव | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव | ३८३ | ९०:१० | ३४४.७ | ३८.३ | १०० | ०१-०२-२०२४ |
| ६ | राजमाने तलाव मौजे मौजे राजमाने, ता. चाळीसगाव, जि. जळगाव | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव | २९९ | ९०:१० | २६९.१ | २९.९ | १०० | ०१-०२-२०२४ |
| ७ | विसापूर तलाव मौजे विसापूर, ता. चाळीसगाव, जि. जळगाव | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव | ३११ | ९०:१० | २७९.९ | ३१.१ | १०० | ०१-०२-२०२४ |
| ८ | देवळी तलाव मौजे देवळी, ता. | मुख्य कार्यकारी अधिकारी, | ३८० | ९०:१० | ३४२ | ३८ | १०० | ०१-०२-२०२४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | चाळीसगाव, जि. जळगाव | जिल्हा परिषद जळगाव | | | | | | |
| ९ | ब्राम्हणशेवगे तलाव मौजे ब्राम्हणशेवगेता. चाळीसगाव, जि. जळगाव | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव | ४५५ | ९०:१० | ४०९.५ | ४५.५ | १०० | ०१-०२-२०२४ |

RAMESH MURARI MANALE

Digitally signed by RAMESH MURARI MANALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Environment Department,
2.5.4.20=3AFDFF0BF288C02A1A4C514992D6AB6F28B31FCBD83BCCF465EC868151EE5BBD, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2A544F07211AC905895E246B961BC9981C480A91372BB58AE26124A46F104C47, cn=RAMESH MURARI MANALE
Date: 2026.04.27 17:17:06 +05'30'

**(रमेश मु. मनाळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**